नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०२/२०२५ (शुक्रवार) सकाळ**

## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन कन्हान :— दिनांक २८/०२/२०२५ रोजी कन्हान पोलीस रात्रगस्त कोबिंग दरम्यान पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय माहीती मिळाली की, एका इसमाने फेसबुक अकांउटवर हातात चाकु घेवुन लोकांचे मनात दहशत निर्माण करण्याचे उददेशाने फोटो काढुन पोस्ट केला आहे. सदर इसमाचे नाव सामेल राजु झाडे, वय १८ वर्षे, रा. वार्ड क्र ३ कांद्री ,कन्हान असे असल्याची माहीती पोलीसांना मिळाली. सदर इसमाचे घरी जावुन विचारपुस पंचासमक्ष घरझडती घेतली असता नमुद इसमाच्या घरून एक लोखंडी पात्याचा धारदार चाकु ज्याची लांबी १४ इंच, पात्याची लांबी ९.५ इंच व पात्याची रूंदी ०२ इंच असलेला मिळुन आल्याने नमुद मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

**आरोपी नामे** सामेल राजु झाडे, वय १८ वर्षे ,रा. वार्ड क्र ३ कांद्री कन्हान,**जि नागपुर याच्या विरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम १९५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास कन्हान पोलीस करीत आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर